चिखलातील खेकड्यांची शेती

बदलत्या वातावरणाला सामोरे जाण्याचे धोरण

Krushna Chandra Sahu

ओडिसाच्या समुद्र किनारपट्टीवर वसलेली अनेक गावे 'वातावरण बदलाच्या' नैसर्गिक आपत्तीमुळे असुरक्षित झालेली दिसतात. विशेषत: ज्या कुटुंबाचा जीवनचरितार्थ शेती व कृषी आधारित आहे अशा कुटुंबांना त्याचा जास्त फटका बसत आहे. ओडिसाच्या केंद्रापाडा जिल्ह्यातील राजनगर तालुक्यातील किनारपट्टीवरील काही गावातील लोक 'धारा' व 'आय.जी.एस.एस.एस.' या संस्थांच्या मार्गदर्शनाखाली 'वातावरण बदलाच्या' परिस्थितीमध्ये जीवन चरिचार्थाचा पर्यायी मार्ग म्हणून चिखलातील खेकड्याची शेती करीत आहेत.

बंगालच्या उपसागराच्या किनारपट्टीवर राहणाऱ्या लोकांच्या जीवनात 'पर्यावरण बदलाच्या' प्रक्रियेचा भाग म्हणून निर्माण होणाऱ्या वातावरणातील चढ-उताराचे वाईट परिणाम होताना दिसतात. किनारपट्टी क्षेत्रात शेती व समुद्र भरतीच्या वेळी खाडीमध्ये मच्छिमारी करणाऱ्या लोकांच्या चरितार्थावर याचा प्रामुख्याने परिणाम जाणवतो आहे. उत्पादन व उत्पन्न या दोन्हीमध्ये सतत तोटा होताना दिसतो. यातून असे प्रकट होते की एकमेव, पारंपारिक कौटुंबिक उत्पन्नाचे मार्ग असुरक्षित व बेभरोशाचे झाले आहेत आणि म्हणून त्या अवस्थेत नवीन पर्यायी मार्ग शोधणे अपरिहार्य झाले आहे. आय.जी.एस.एस.एस या संस्थेच्या मार्गदर्शनाखाली 'धारा' या संस्थेने निवडक ५ गरजू कुटुंबांना त्यांच्या घराच्या परिसरात 'चिखलातील खेकड्यांची शेती' हा प्रयोग सुरू करण्यास मदत केली. खाऱ्या पाण्यात बांबूनी बनवलेल्या पिंजऱ्याच्या सहाय्याने हा प्रयोग के ला जात आहे.

किनारपट्टीवरील वस्त्यांमध्ये प्रत्येक घराच्या परिसरात खाऱ्या पाण्याचा परिसर असतोच. अगदी गोड्या पाण्याचे साठे देखील समुद्राच्या लाटांनी खारे पाणी होण्याची शक्यता नेहमीच असते. असे खारे पाणी शेतीच्या सिंचाईसाठी उपयुक्त नसते. अशा जागेत नगदी पीक म्हणून कोलंबी उत्पादनास वाव आहे. पण त्या व्यतिरिक्त अशा पाणीसाठ्याचा दुसरा कोणताही उपयोग नसतो.

'खेकडी' हा अशा परिसरातील लोकांच्या रोजच्या जेवणातला भाग असतो. शिवाय बाजारात सध्या खेकड्यांची मागणी वाढत आहे. हे लक्षात घेऊन अशा पाण्यात खेकड्याची शेती करण्याचा पर्याय समोर आला. असे चिखलात वाढलेले खेकडे हे सेंद्रिय पद्धतीने वाढवलेले सिद्ध होतात. परंतु खुल्या पाणीसाठ्यामध्ये असे खेकड्याचे उत्पादन घेणे खूपच खर्चिक असते. या सर्वांचा विचार करून 'धारा'च्या कार्यकर्त्यांनी स्थानिक लोकांसोबत एक नियोजन केले. त्याचे खर्च व मिळकत याचे अंदाजपत्रक



घराच्या मागील भागात खाऱ्या पाण्यात खेकड्याची शेती



खेकड्याचे वजन वाढण्यासाठी खाद्य म्हणून मासे खायला घालताना

देखील बनविले. हे नियोजन राबविण्यासाठी सामाजिक आर्थिक परिस्थिती, पारंपारिक व्यवसाय व इच्छाशक्ती या निकषाच्या आधारे लोकांनी पाच कुटुंबांची निवड केली. या कुटुंबातील प्रतिनिधींना तसे प्रशिक्षण दिले गेले.

खेकडा निसटून जाऊ नये म्हणून छोट्याशा गुंतवणुकीतून बांबूचे पिंजरे बनवून घेतले. स्थानिक कारागिराकडून ते बनवले गेले. सप्टेंबर शेवटीपासून ते मार्चपर्यंत छोटे खेकडे (१५० ते १८० ग्रॅम) पिंजऱ्यात सोडले जातात. दोन आठवडे सलग त्यांना मासे व त्यांचे अवयव खायला देतात. या दोन आठवड्यात खेकडे बऱ्यापैकी तयार होतात.

तक्ता १ : खिंवलातील खेकड्यांची शेती लागणारा खर्च व त्यातून होणारी मिळकत

अ.क्र.	बाब	शेरा/तपशील	रक्कम
१	मूलभूत लागत		
१.अ	बांबूचा पिंजरा	६ x ४ x २.५ (पाच बांबू, दोरी, पाच मनुष्य + दिवस वाहतूक खर्च)	२६८५.००
१.ब	चिमटा व बास्केट		३००.००
	एकूण मूलभूत भांडवली खर्च	तीन वर्षांसाठी २४ वेळेला वापर	२९८५.००
अ.	एका बॅचसाठी गुंतवणूक	२९८५/२४	१२५.००
इ.	अपरिपक्व खेकडे	१५० ते १८० ग्रॅमचे ८ किलो @ रु. २३८ x ८ = १९०४	१९०४.००
उ.	खाद्य खर्च १५ दिवस	अंदाजित खर्च	१५०.००
ऊ	मजुरी	१५ मिनिट रोज सकाळ-संध्याकाळ २३० मिनिट x १५ दिवस = १ दिवस	३००.००
	एकूण एक बॅचचा खर्च	२४७९.००	
२.	एकूण मिळकत	८ किलो रु. ५००	४०००.००
२.१	एका बॅचचा निव्वळ नफा	रु. ४००० - २४७९ = १५२१ (१५ दिवस)	१५२१.००
२.२	एका सिझनचे निव्वळ उत्पादन	किमान ८ बॅच प्रति सिजन	१२१६८.००



विक्रीसाठी तयार झालेला खेकडा

साधारणत:

चार महिन्याच्या सिझनमध्ये ही कुटुंब रु. ३५००/- ते ४५००/- रुपये मिळवतात. पण खिंवलातील खेकड्यांची शेती या प्रयोगातून एका सिझनमध्ये एक कुटुंब साधारणत: १२००० रुपये कमवू शकते. (तक्ता क्र. १ पहावा). प्रति कुटुंब ही होणारी वाढीव मिळकत नोंद घेण्याजोगी नक्कीच आहे. वातावरण बदलाच्या संकटामध्ये हा मोठा दिलासा या गावकऱ्यांसाठी होऊ शकतो.

Krushna Chandra Saho
Head Livelihood
Indo-Global Social Service Society-IGSSS
118, Garfa Main Road,
Kolkata- 700075
West Bengal
E-mail: sahu@igsss.net

मराठी अनुवाद - श्री. दत्ता पाटील, युवा रुरल असोसिएशन, नागपूर

Source : Mud crab farming - An adaptation strategy, LEISA India, June 2017